# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 248/2022 दिनांक : 23.06.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**माळाकोळी :—**दिनांक 17.06.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात लिंबाच्या झाडाखाली व दहा दिवसापुर्वी फिर्यादीचे घरी बाबुळगाव ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील आरोपीने तुझ्या वडीलांनी लग्नात सोफासेट व टि.व्ही. का दिला नाही म्हणुन फिर्यादी सोबत नेहमी भांडण करीत असल्याने व तिचा छळ करीत असल्याने गेल्या दहा दिवसापुर्वी फिर्यादी ही गावातच माहेरी गेल्याने आरोपीने तिचे घरी जावून फिर्यादीस मोटार सायकलवर बसवून नमुद ठिकाणी तिला तुझे आई वडील सोफासेट का देत नाहीत म्हणुन तुला आता खतम करतो म्हणुन फिर्यादीचे दोन्ही हात धरुन तिला खाली पाडुन तिचे पोटावर बसून दाबून धरले खिशातील विषारी औषधाचा डब्बा काढुन फिर्यादीचे तोंड दाबून धरुन तिचे तोंडात विषारी औषध टाकुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी 18 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 70/2022 कलम 307,468(अ) भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री डोके, मो. नं. 8652147575** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**लिंबगाव :—**दिनांक 21.06.2022 रोजी रात्री 21.30 वा. चे सुमारास, **नवीन हसापुर टी. पॉईंट गोदावरी नदीचे पुला जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीची मो.सा. आडवुन फिर्यादी व साक्षीदार यांना लोखंडी रॉडने मुक्का मार मारुन चाकुचा धाक दाखवुन जबरदस्तीने फिर्यादीचे ताब्यातील होंडा कंपनीची काळया रंगाची जुनी वापरती मो सा क्रं. एम.एच.—26/ए.एम.—7028 किंमती 25,000/—रुपयाची जबरीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी बालाजी शामराव जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. वडगाव तांडा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 110/2022 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री पवार**, **मो.क्र. 9823288458** हे करीत आहेत.

## 3)खंडणी :—

**1)देगलुर :—**दिनांक 08.03.2022 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **नगरपरिषद कार्यालय लगत चहाचे हॉटेलजवळ देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद आरोपीने माहिती अधिकार मध्ये फिर्यादीचे कामाची माहिती न मागण्यासाठी व तक्रार न करण्यासाठी 6000/—रुपयाची मागणी करुन फिर्यादी कडुन 6000/— रुपये नगदी स्वरुपात खंडणी घेतली होती परंतु आरोपी हा देगलुर शहरातील असल्याचे फिर्यादीची बदनामी करण्याची धमकी दिली असल्याने त्याचे पासुन भविष्यात धोका निर्माण होईल या भितीने फिर्यादीने तक्रार दिली नाही. पोलीसानी वर्तमानपत्रात कोणी खंडणी मागीतली असेल घेतली असेल तर तक्रार देण्याचे आवाहन केल्याने आज रोजी तक्रार दिली आहे. वगैरे **फिर्यादी संतोष विठ्ठलराव देशमुख, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी लिपीक न.प. देगलुर रा. आल्लापुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 298/2022 कलम 384 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

**2)देगलुर :—**दिनांक 21.05.2022 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **जि.प. रुग्नालय, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद आरोपीने उप जिल्हा रुग्नालय देगलुर येथे चहा फराळाचे हॉटेलात माहिती अधिकार खाली अर्ज करुन माहिती मागवुन माहिती न देणेसाठी यापुढे अर्ज न करण्यासाठी नौकरी घालवण्याची धमकी देवून 20,000/—रुपयाची मागणी करुन फिर्यादी कडुन 5000/— रुपये तरी द्यावेच लागतील म्हणुन खंडणी मागीतली. वगैरे **फिर्यादी बाबुराव किशनराव यरसनवार, वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी कनिष्ठ लिपीक उप जिल्हा रुग्नालय, देगलुर रा. पेठवडज ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 299/2022 कलम 385,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

**3)देगलुर :—**दिनांक 03.01.2022 रोजी 10.30 वा. व 16.30 वा. चे दरम्यान, **न.प. बांधकाम विभाग कार्यालय, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद आरोपीने बदनामी करण्याची धमकी देवून व कामाची माहिती न मागण्यासाठी व तक्रार न करण्यासाठी 5,000/—रुपयाची मागणी करुन फिर्यादी कडुन 5000/— रुपये खंडणी घेतली. वगैरे **फिर्यादी अशोक जळबाजी पाटील, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी न.प. देगलुर रा. रायवाडी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 300/2022 कलम 384,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

# 4)मो. सा. चोरी :–

**1)मुखेड :–** दिनांक 15.06.2022 रोजी चे 13.00 वा. चे सुमारास, **पंचायत समीती मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो. सा. क्रं. एम.एच.–26/बीजे.–0274 किमती 15,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गौतम तुकाराम ससाने, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोजेगाव ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 196/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/भारती, मो. क्र. 02461–222533** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 14.06.2022 रोजी चे 09.00 ते 15.30 वा. चे दरम्यान, **वेंदात नगरी यश नगरी जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो. सा. क्रं. एम.एच.–26/एल.–8221 किमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी पोना/288, बसलींग भुजंगराव एकलारे, ने. पोस्टे शिवाजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 214/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2197 वच्चेवार, मो.क्र. 9657578281** हे करीत आहेत.

# 5)विवाहीतेचा छळ :–

**1)बिलोली :–** ऑक्टोबर 2019 ते दि. 22.06.2022 चे 10.00 दरम्यान, फिर्यादीचे सासरी थडी हिप्परगा ता. मदनुर **जि. निजामाबाद तेलंगाना राज्य ह. मु. अजनी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी ही सासरी असतांना तुझ्या माहेरहुन 5 ग्रॅमची अंगठी व पैसे घेवुन ये असे म्हणुन फिर्यादीस मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी** 23 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 162/2022 कलम 498(अ), 323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1985 जी. बी. शिंदे, मो.क्रं. 7721005064** हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 01.10.2021 ते दि. 03.06.2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी कोठारी (चि) ह. मु. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस थापड बुक्यांनी मारहाण करून आरोपी क्रं 5 चे नादाला लागुन घराचे बाहेर हाकलुन दिले तसेच ॲटो घेण्यासाठी माहेरहुन 60,000/–रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 33 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 125/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1952 कल्लाळे, मो.क्रं. 7768853060** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–** माहे फेब्रुवारी 2019 ते दि. 28.03.2022 चे दरम्यान, **गायकवाड गल्ली मुखेड ता. मुखेड ह. मु. बळीरामपुर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस छोटया छोटया कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन मारहाण केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 22 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 374/2022 कलम 498(अ), 323, 506, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2121 पांचाळ, मो.क्रं. 9011079556** हे करीत आहेत.

# 6)भारतीय हत्यार कायदा :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **पंचशिलनगर ब्रिजच्या बाजुला नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/संजय धोंडीराम निलपत्रेवार, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 218/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1020 आडे, मो.क्र. 9823467191** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **मौ. सरसम ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी विनापरवाना बेकायदेशीर रित्या पिस्टल बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/नंदलाल भुरालाल चौधरी, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 148/2022 कलम 6/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोह/1828 कागणे, मो.क्र. 9921623333** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **जुनी ग्रामपंचायत जवळ हिमायतनगर ता. हि. नगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 2500/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1162, सुरेश गोविंदराव श्रीमंगले, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 149/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो.क्र. 9049078531** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 13.50 वा. चे सुमारास, **जुनी ग्रामपंचायत जवळ हिमायतनगर ता. हि. नगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 3060/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1162, सुरेश गोविंदराव श्रीमंगले, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 149/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो.क्र. 9049078531** हे करीत आहेत.

**3)किनवट :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 13.55 वा. चे सुमारास, **गोंड राजे मैदानाजवळ बाजार लाईन बाबु यांचे हॉटेलच्या पाठीमागे मोकळया जागेत किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 1240/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी राजु अशोक मोरे, ने. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 127/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1326 चौधरी, मो.क्र. 9158134034** हे करीत आहेत.

**4)किनवट :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **कृष्णा बॅंड पार्टीच्या बाजुला भाजी मार्केट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 7850/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी राजु अशोक मोरे, ने. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 128/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1913 राठोड, मो.क्र. 9552888455** हे करीत आहेत.

**5)किनवट :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 14.40 वा. चे सुमारास, **भाजी मार्केट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 2370/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1785, मनिराम किशन आडे, ने. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 129/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1952 कल्लाळे, मो.क्र. 770971952** हे करीत आहेत.

**6)हिमायतनगर :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 14.20 वा. चे सुमारास, **लकडोबा चौक हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत असतांना 3850/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/अनिल विठ्ठलराव कांबळे, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 151/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1791 राठोड, मो.क्र. 9112141791** हे करीत आहेत.

**7)इतवारा :–** दिनांक 22.06.2022 रोजी चे 18.10 वा. चे सुमारास, **फंक्शन मेन्सपार्लर जवळ सार्वजनिक रोडवर देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत असतांना 1340/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/436, एकनाथ सखाराम मोकले, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 153/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/बिसाडे, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**धर्माबाद :–** दिनांक 22.06.2022 रोजी 19.20 वा. चे सुमारास, **रेल्वेस्टेशन करखेली आरोपीचे घराजवळ मोकळया जागेत करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1920/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/आबेद गोसोदीन सय्यद, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 160/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2436 जाधव, मो.क्र. 9421841380** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड